-: **<u>प्रेस नोट</u>** :- दिनांक ०५.०३.२०१९

-: स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण :-

**अकलुज पोलीस ठाणे येथील तसेच सातारा, पुणे ग्रामीण, सोलापूर शहर जिल्हयात दुचाकी मोटार सायकलच्या चोरी करणारा ०१ संशयित आरोपी व चोरीच्या मोटार सायकली घेणारे ०३ इसम असे एकूण ०४ आरोपी यांना ताब्यात घेऊन त्यांचे कडुन ७ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या एकूण १९ दुचाकी मोटार सायकल हस्तगत**

---

सोलापूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस ठाणेच्या विविध हद्दीत मिळुन सन २०१८ मध्ये ४६६ व जानेवारी २०१९ अखेर ६५ दुचाकी मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांची नोंद झालेली आहे. सदर दुचाकी मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांची उकल होण्याच्या अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील व अपर पोलीस अधीक्षक श्री.अतुल झेंडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अरुण सावंत यांना सदर गुन्हयांना प्रतिबंध करणेसाठी विशेष पथक नेमण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे पोनि/अरुण सावंत यांनी स्थागुशा कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष पथक नेमले होते.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अरुण सावंत त्याचे गोपनिय बातमीदारकरवी बातमी मिळाली होती की, रेकॉर्डवरील गुन्हेगार नामदेव बबन चुनाडे (रा.अनिल नगर पंढरपुर ) हा सध्या जेल मधुन बाहेर आलेला असून तो आणखीन दुचाकी मोटार सायकल गाडयांची चोरी करीत आहे. यावरुन स्थागुशा कडील पथक हे सुमारे १ महिन्या पासुन त्याचे पंढरपूर येथील घरावर वॉच ठेवुन त्याचे मागावर होते. तसेच त्याचे मित्र, नातेवाईक यांचीही माहिती घेत होते. त्यादरम्यान सदरचा गुन्हेगार हा मंगळवेढा येथे चोरी केलेली मोटार सायकल ही पंढरपूर बायपास रोड वरील रंजित पवार यास विक्री करणे करीता येणार असून तो बायपास रोड वरील टोल नाक्याजवळ थांबलेला असल्याची बातमी मिळाली होती.

मिळालेल्या बातमी प्रमाणे पोनि/अरुण सावंत यांनी मंगळवेढा येथे पेट्रोलिंग करीत असलेल्या स्थागुशा कडील पो.उप.निरी. श्री. हेमंत भंगाळे, पोह/ महमंद इसाक मुजावर, पोह/ नारायण गोलेकर, पोह/गोरक्षनाथ गांगुर्डे यांना सदरची बातमी दिली. त्याप्रमाणे ते मंगळवेढा येथील बायपास जवळील टोल नाक्याच्या ठिकाणी गेले. तेथे त्यांना एक संशयित इसम हिरो स्प्लेंडर प्रो या दुचाकी मोटार सायकलवर संशयितरित्या थांबलेला दिसला. त्या इसमाचा स्थागुशा कडील अधिकारी व कर्मचारी यांना संशय आल्याने त्यांनी त्यास गराडा घालुन पकडले. त्यास त्याचेजवळ असलेल्या दुचाकी मोटार सायकल बाबत विचारता त्यांनी प्रथम उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यानंतर त्यास अधिक विश्वासात घेऊन विचारपूस करता त्या इसमाने सदरची मोटार सायकल ही सुमारे ३ महिन्यापुर्वी अकलुज भागातुन रात्रीचे वेळी चोरुन आणली असल्यचे सांगितले. त्या इसमाचे त्याचे नाव, गाव, वय, पत्ता विचारता त्यांने त्याचे नाव **नामदेव बबन चुनाडे ( वय ४४ वर्ष रा.अनिल नगर पंढरपूर )** असे सांगितले. त्यास अधिक विश्वासात घेवुन त्याने अजुन कोठुन दुचाकी मोटार सायकलच्या चोरी केल्या आहेत याबाबत त्याचेकडे विचारपूस करता त्यांने मागील काही महिन्या पासुन सातारा, पुणे व सोलापूर जिल्हयातुन वेगवेगळया भागातुन रात्रीच्या वेळी त्याने खास दुचाकी मोटार सायकली चोरी करणे करीता बनविलेल्या चावीने मोटार सायकलचे लॉक उघडुन मोटार सायकलची चोरी करुन त्या त्याचे ओळखीचे इमस नामे **(१) ऋषिकेश विनोद वाडेकर ( रा.अनिल नगर पंढरपूर) (२) रंजित सौदागर पवार ( रा. रहाटेवाडी मंगळवेढा ) (३) भाग्योदय उर्फ बबलु दामोदर काळुखे (रा.मंगळवेढा )** यांच्या मार्फतीने चोरी केलेल्या दुचाकी मोटार सायकली हया विक्री करीत असल्याचे सांगितले.

त्यानंतर स्थागुशा कडील अधिकारी व कर्मचारी यांनी ताब्यात घेतलेल्या इसमांनी सांगितलेल्या वरील तिन्ही इमसाचा मंगळवेढा परिसरात शोध घेतला असता ते तिघे मिळुन आल्याने त्या सर्वांना ताब्यात घेऊन त्यांना नामदेव बबन चुनाडे यांनी विक्री केलेल्या दुचाकी मोटार सायकल बाबत विचारपूस करता त्यांनी नामदेव चुनाडे यांनी त्या सर्वांना मोटार सायकली दिल्या असल्याचे सांगितले.

ताब्यात घेतलेल्या वरील तिघा इसमानी लोकांना चोरीच्या विकलेल्या अनुक्रमे ०८ युनिकॉर्न, ०९ हिरो स्प्लेंडर,०१ होडा शाईन, ०१ अॅक्टीव्हा अशा ७ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या एकूण १९ दुचाकी मोटार सायकल हस्तगत केल्या आहेत. ताब्यात घेतलेल्या ०४ संशयित इसमाना व हस्तगत करण्यात आलेल्या १९ दुचाकी मोटार सायकली हया पुढील कार्यवाहीसाठी अकलुज पोलीस ठाणेच्या ताब्यात दिले आहे.

**सदर ताब्यात घेतलेला संशयित इसम नामदेव बबन चुनाडे ( वय ४४ वर्ष रा.अनिल नगर पंढरपूर ) याचे विरुध्द सोलापूर ग्रामीण, सांगली, सातारा, पुणे शहर आयुक्तालय, पुणे ग्रामीण, सोलापूर शहर, आयुक्तालय व अहमदनगर या ठिकाणी यापुर्वी चोरी व घरफोडीचे असे एकूण ३१ गुन्हे दाखल आहेत.**

**ताब्यात घेतलेल्या इसम नामदेव बबन चुनाडे हा सोलापूर ग्रामीण जिल्हयाकडील कुर्डुवाडी गुरनं ६१/२०१५ भादंवि कलम ३७९ व सांगोला पोलीस ठाणे गुरनं ८८१/२०१७ भादंवि कलम ३७९ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी आहे.**

**याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ज्यांच्या वरील कंपनीच्या दुचाकी मोटार सायकल हया चोरीस गेलेल्या आहेत अशा नागरिकांनी त्याचे कडील वाहनाचे कागदपत्रासह अकलुज पोलीस ठाणेस संपर्क साधणेस विनंती आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील, मा.अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण श्री. अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अरुण सावंत यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक हेमंत भंगाळे, सपोफौ/अल्ताफ काझी, महमंद इसाक मुजावर,पोहवा/नारायण गोलेकर,गोरक्षनाथ गांगुर्डे, मोहन मनसावाले, पोकॉ/अक्षय दळवी, पांडुरंग केंद्रे, सचिन मागाडे व खंडु माळी यांनी बजावली आहे.

-- 00 --